## स्वागतम, सुस्वागतम.....

## मनपाच्या शाळेत विद्‌यार्थ्यांचे औक्षण करून ढोलताशांच्या गजरात स्वागत

## महापालिकेच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत विविध शाळांमध्ये विद्‌यार्थ्यांना पुस्तक वाटप

पनवेल महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महानगरपालिकेच्या 10 शाळांमध्ये पहिल्या दिवशी 1 ली ते 7 वीच्या विद्‌यार्थ्यांना गुलाब पुष्प देऊन, औक्षण करून ,ढोल ताशांच्या गजरात आज जोरदार स्वागत करण्यात आले. याचबरोबर'१०० शाळांना भेटी देणे' या उपक्रमाअंतर्गत शाळेच्या पहिल्या दिवशी महापालिका अधिकाऱ्यांनी विविध शाळांना सदिच्छा भेट देऊन विद्‌यार्थ्यांना पुस्तक वाटप केले.

शासनाच्यावतीने १०० शाळांना भेटी देणे हा उपक्रम राबवण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत. या उपक्रामांतर्गत अधिकाऱ्यांनी शाळांना भेट देऊन प्रवेशोत्सवात सहभागी होऊन पुस्तक वाटप करण्याबाबत सूचना दिल्या आहेत. या उपक्रमांतर्गत लोकनेते दि.बा. पाटील शाळेमध्ये अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे व उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांच्या हस्ते विद्‌यार्थ्यांना गुलाबपुष्प देऊन, पुस्तक वाटप करण्यात आले. तसेच शाळेची पाहणी करण्यात आली. यावेळी शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण व मुख्याध्यापक श्री. राठोड उपस्थित होते.

तसेच अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे यांनी हिरवे गुरूजी मनपा प्राथमिक शाळा (दगडी शाळा) येथेही सदिच्छा भेट दिली. यावेळी माजी नगरसेविका दर्शना भोईर ,शाळा व्यवस्थापन समिती मार्गदर्शक श्री.वत्सराज, व श्री.सुजित म्हात्रे उपस्थित होते.

तर परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे यांनी मनपा प्राथमिक शाळा क्रमांक. 4 कोळीवाडा पनवेल येथे भेट देऊन विद्‌यार्थ्यांचे स्वागत केले. उपायुक्त स्वरूप खारगे हयांनी मनपा प्राथमिक शाळा क्रमांक. ६ धाकटे खांदे पनवेल येथे भेट सदिच्छा भेट दिली. तसेच मुख्य लेखा व वित्त अधिकारी मंगेश गावडे यांनी मनपा प्राथमिक शाळा तक्का येथे भेट दिली. यावेळी त्यांच्या हस्ते विद्‌यार्थ्यांना पाठ्य पुस्तके वाटप करून विद्‌यार्थ्यांचे स्वागत केले व विद्‌यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी माजी नगरसेवक जयंत पगडे, अजय बहिरा उपस्थित होते.

तसेच लेखा परीक्षक निलेश नलावडे यांनी मनपा प्राथमिक शाळा पोदी येथे सदिच्छा भेट दिली. तसेच शाळेतील स्वच्छता आणि वर्ग पाहणी करण्यात आली. यावेळी माजी नगरसेवक मनोज भुजबळ आणि माजी नगरसेविका सुशीला घरत उपस्थित होते.

शाळेच्या पहिल्या दिवशी झालेल्या स्वागताने विद्‌यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद सर्व उपस्थितांनाही आनंद देत होता.